परिपत्रक क्रमांक ३५१ दिनांक १५/५/२००९

2675/09

आयुक्त, महाराष्ट्र
मुंबई यांचे कार्यालय
16 MAY 2009

विषय :- बदली रजेबाबत..

असे निदर्शनास आले आहे की, कार्यालयीन कर्मचारी हे बदली रजा घेता येते या दृष्टीकोनातून सार्वजनिक सुट्टीचे दिवशी कार्यालयात उपस्थित राहून काम करण्यासाठी परवानगी घेत असतात. परंतु पुढे असेही निदर्शनास आले आहे की, सुट्टीच्या दिवशी कामावर येण्यासाठी दैनंदिन कामांचा निपटारा केला जात नाही व प्रलंबित ठेवलेली कामे सुट्टीच्या दिवशी पूर्ण करण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहून सुध्दा प्रलंबित कामे पूर्ण करीत नाहीत. तसेच काही कर्मचारी स्वतःच्या शाखेतील काम नसतांना दुस-या शाखेतील प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी सुट्टीच्या दिवशी कार्यालयात हजर राहणे हे योग्य नाही.

अशा प्रकारच्या प्रवृत्तीस आळा बसावा आणि अत्यंत आवश्यक कामाचा निपटारा करावयाचा असेल तरच कार्यालयात उपस्थित रहावे. अन्यथा कोणत्याही कर्मचा-यास सुट्टीच्या दिवशी कार्यालयात कामासाठी बोलावण्यांत येऊ नये. तथापि विधानसभा अधिवेशन कालावधी वगळता कोणत्याही कर्मचा-यास सुट्टीच्या दिवशी कार्यालयात बोलावण्यांत येऊ नये याची दक्षता संबंधीत कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

तसेच असेही निदर्शनास आले आहे की, बरेचसे कर्मचारी त्यांना अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारच्या रजा वारंवार उपभोगत असतात. परिणामी त्यांच्या टेबलचे काम ब-याच प्रमाणात प्रलंबित राहते आणि त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या अनुज्ञेय रजांचे प्रमाण खूपच कमी असते. त्यामुळे भविष्यात रजेची गरज भासली तर बदली रजा मिळावी याच उद्देशाने कर्मचारी सुट्टीचे दिवशी कामावर हजर रहात असतात.

तेव्हा जर अत्यंत आवश्यक कामासाठी कर्मचा-यांना सुट्टीच्या दिवशी कामावर हजर राहणे क्रमप्राप्त असेल तरच पुढील अटींच्या अधीन राहून त्यांना बदली रजा मंजूर करण्यांत यांवी. अन्यथा बदली रजा अनुज्ञेय होणार नाही असे समजण्यांत यांवे.

१. अत्यावश्यक कामाबाबतचा तपशील सुट्टीच्या दिवशी कामावर येणेपूर्वी सविस्तर सादर करावा.

२. सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल संबंधीत अधिका-यांचे अभिप्रायाने तात्काळ दुस-या दिवशी सादर करावा.

३. बदली रजा संबंधीत अधिका-यांचे पूर्व परवानगीने तसेच नियमित कार्यालयीन कामकाजांमध्ये अडथळा निर्माण होणार नाही याची सर्व संबंधीतांनी दक्षता घ्यावी.

४. फक्त पहारेकरी यांना जादा काम केल्याबद्दल बदली रजा उपभोगता येणार नाही. त्याऐवजी त्यांना दैनिक भत्त्याची मागणी करता येईल.

५. वर्ग-४ मधील कर्मचा-यांनी पहारेक-याच्या अनुपस्थितीमध्ये पहारेक-याचे काम केल्यास त्यांना बदली रजा अनुज्ञेय राहील किंवा दैनिक भत्त्याची मागणी करता येईल.

वरील अटींचे सर्वत्तोपरी पालन करण्याची जबाबदारी सर्व संबंधीत कर्मचा-यांची आहे.तसेच वरीलप्रमाणे अटी पूर्ण केल्याशिवाय संबंधीत कर्मचा-यांची बदली रजा मंजूर करण्यांत येऊ नये याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सर्व संबंधीत कार्यालये.